महाराष्ट्र शासन
समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
दूरध्वनी क्र.२०-२६१२७५६९ ईमेल - sakalyangovthostel@gmail.com

क्र.सकआ/शिक्षण/ स्वाधार/अर्ज मुदतवाढ/ 625/पुणे, दिनांक: 4.०३.२०२५
ऑनलाईन प्रणाली/२०२४-२५/का-५ब/

प्रति,

१. प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण (सर्व)
२. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)

विषय: भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज करण्यास १५ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ: १) आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. ३२५३, दिनांक १४.१०.२०२४.
२) आयुक्तालयाचे मुदतवाढ परिपत्रक क्र. ३६४५, दिनांक २८.११.२०२४.
३) आयुक्तालयाचे मुदतवाढ परिपत्रक क्र. ७१६४४२, दिनांक २८.११.२०२४
४) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. बीसीएच-२०१६/प्र.क्र.२९३/शिक्षण-२ दि. २६.१२.२०२४.
५) आयुक्तालयाचे मुदतवाढ परिपत्रक क्र. ६५, दिनांक ०६.०१.२०२५.
६) आयुक्तालयाचे पत्र क्र. ६२२ दि. ०४.०३.२०२५

आयुक्तालयाचे परिपत्रकान्वये शासकीय वसतिगृह प्रवेश व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजने अर्ज ऑनलाईन पोर्टलव्दारे स्वीकारण्यात आलेले आहेत. संदर्भ क्र. ५ अन्वये स्वाधार योजनेचे अर्ज करण्यास १५ जानेवारी २०२५ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली होती

संदर्भ क्र ४ च्या शासन निर्णयान्वये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची व्याप्ती तालूका स्तरापर्यंत वाढविण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांचे उशिरा सुरु होणारे शैक्षणिक सत्र, ऑनलाईन अर्ज भरताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी इ. कारणामुळे विविध विद्यार्थी संघटना, पालक, विद्यार्थी यांचेकडून सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील स्वाधार योजनेचे अर्ज करण्यास मुदतवाढ देण्याबाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार संदर्भ क्र ६ अन्वये स्वाधार योजनेचे अर्ज करण्यास मुदतवाढ मिळणबाबत शासनास विनंती केलेली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत दिनांक १५ मार्च २०२५ पर्यंत वाढविण्यात येत आहे.



Scanned with CamScanner

तसेच यापूर्वी स्वाधार योजनेचा अर्ज केलेल्या विद्यार्थ्यासाठी बँक तपशिल भरण्याबाबतचा टॅब उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने सर्व विद्यार्थ्यांचे बँक तपशिल भरुन घेण्याच्या अनुंषगाने तात्काळ कार्यवाही करावी.

त्याचप्रमाणे सर्व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी सध्या जिल्हा माहिती व प्रसिद्धी अधिकारी,जिल्हा माहिती कार्यालयाकडून सर्व वर्तमान पत्रातून या दोन मुदयांबाबत व्यापक व विनामुल्य प्रसिध्दी करावी.

मा. आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने

(प्रमोद जाधव)
सहआयुक्त (शिक्षण),
समाज कल्याण आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत : माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव

१. मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. प्रकल्प अधिकारी महाआयटी कॉर्पोरेशन लि. ए.पी.जे हाऊस चर्चगेट मुंबई यांना सुचित करण्यात येते की, सदर स्वाधार योजनेस अर्ज करण्यास मुदतवाढीच्या अनुषंगाने आवश्यक तांत्रिक कार्यवाही तात्काळ करावी.

Scanned with CamScanner